
# सुशासन

## (तत्वे आणि पद्धती)




संपादक
डॉ. नितीन गौरखेडे
डॉ. मुक्ता सोमवंशी

Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# सुशासन

(तत्वे आणि पद्धती )

■ डॉ. नितीन गौरखेडे
डॉ.मुक्ता सोमवंशी

■ प्रथम आवृत्ती – २५ , डिसेंबर २१)

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN- 978-93-91305-63-5

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

| | | |
|---|---|---|
| 14 | सुशासनाच्या निर्मितीत ई-प्रशासनाची भूमिका<br>**सहा.प्रा. ठाकरे डी. डी.** | 91 |
| 15 | लोकशाही — निवडणूक आणि सुशासन : एक चिकित्सक अध्ययन **डॉ. सुभाष दौलतराव उपाते** | 100 |
| 16 | सुशासन : संकल्पना, निर्धारक तत्व आणि आव्हानांचे विश्लेषण<br>**प्रा.डॉ.लक्षटे आर.बी / प्रा.डॉ.लक्षटे बी.बी.** | 108 |
| 17 | सुशासन आणि राजकीय पर्यावरण<br>**डॉ.जीवन एच.पवार / रुपसिंग दशरथ राठोड** | 114 |
| 18 | सुशासन : संकल्पना आणि महत्व<br>**प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे** | 123 |
| 19 | सुशासन संकल्पना आणि महत्व **कठरे धानाजी नारायण** | 132 |
| 20 | सु-शासन निर्मितीत जनतेचा सहभाग<br>**डॉ. सोमवंशी मुक्ता गोविंदराव** | 138 |
| 21 | लोकशाही,सुशासन आणि त्याच्या यशस्वीतेची आधारभूत तत्वे **प्रा. डॉ.पदमाकर प्रेमदास दारोंडे** | 146 |
| 22 | भारतातील सुशासन : एक अध्ययन **डॉ. माया वाटाणे** | 153 |


Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# लोकशाही – निवडणूक आणि सुशासन: एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**

सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली

Email ID : subhashupate05@gmail.com

सारांश:

जगातल्या बहुतांश देशांनी लोकशाही स्वीकारली. आशिया व आफ्रिका खंडातील देशांनी लोकशाही त्यांचे ध्येय मानले तर पश्चिमात्य देशांनी व संयुक्त राज्य अमेरिकने लोकशाहीला जीवनपद्धती मानले आहे. चीनच्या संविधानात राजकीय व्यवस्थेचे वर्णन 'पीपल्स डेमॉक्रॅसी' असे केले आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मूल्य व लोकशाही प्रक्रियेचा स्विकार या अर्थाने अमेरिकन लोक लोकशाहीकडे पाहतात. भारतीय लोकशाहीत राजकीय व्यवस्था ही सर्वच पातळ्यांवर निर्वाचन यंत्रणेचा सन्मान करून भयमुक्त वातावरणातील निवडणूका, निर्वाचन तत्व, त्याला संवैधानिक दर्जाचे आवरण निवडणूक अभियोगाच्या रूपाने सजीवपणे कार्यरत आहे. ''१९९० च्या दशकामध्ये कारभार प्रक्रिया/सुशासन या संकल्पनेचा उदय झाला. तत्पूर्वी शासन–प्रशासन प्रक्रिया ही केवळ शासनाची एकाधिकारशाही मानली जाई. प्रक्रियेच्या प्रसारामुळे खासगी क्षेत्रानेही यात आपला सहभाग नोंदवला. सुशासनाच्या संकल्पनेत नागरिक मध्यवर्ती आहेत. नागरिककेंद्री प्रशासनामध्ये नागरिकांचा आवाज शासनप्रक्रियेमध्ये उमटला जाणे स्वागतार्ह आहे. अर्थात नागरिकांच्या सनदेव्दारे संघटना पारदर्शक, जबाबदार व नागरिकांशी सुसंवादी बनते.''[१] यात संदेह नाही.

**मुळ शब्द** :– लोकशाही, निवडणूक, सुशासन.

प्रस्तावना:

''सुशासन निर्माण होण्यासाठी सर्वच पातळ्यांवर जनता आणि प्रशासनातील समन्वय खूप महत्त्वाचा आहे, 'नागरिक, शासन आणि प्रशासन का त्रिकोण जास्तीत जास्त सशक्त करणे गरजेचे आहे. गतिमान प्रशासनासाठी उपक्रमशीलता आणि सातत्य' असणे आज निकडीचे झाले आहे.''[२] दरवर्षी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त 'सुशासन दिवस' साजरा केला जातो. सर्वस्पर्शी विकास आणि समन्वयाचा मोठा संबंध आहे. जनता आणि प्रशासनामध्ये सुसंवाद असेल तर सुशासन निर्माण होणे अत्यंत सुलभ होते. जबाबदार प्रशासन आणि सर्वस्पर्शी विकास यांचाही घनिष्ठ संबंध



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

[illegible] या मध्ये नागरिकांना जास्तीत जास्त सहभागी करून घेणे हे सुशासन [illegible] उद्दिष्ट आहे. तसेच सुनियोजित उद्धिष्टपुर्तीसाठी योग्य मार्ग निवडून [illegible] प्रयत्न करणे म्हणजेच प्रशासन होय. अशा प्रकारचे लोकाभिमुख [illegible] निर्माण करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. त्याच बरोबर [illegible] सुलभता आणि पारदर्शकता येणे महत्वाचे असते. या सर्व गोष्टीमधून [illegible] सर्व घटकांचा विकास साधला जातो.''[३] या प्रकारचा पार्श्वभाग [illegible] जाधव यांनी व्यक्त केला.

[illegible] उद्दिष्टे :

१) लोकशाहीच्या तात्वीक अधिष्ठानाचे अध्ययन करणे.

२) निवडणुकांच्या यंत्रणेबाबत अध्ययन करणे.

३) सुशासनाच्या संकल्पनेचे अध्ययन करणे.

लोकतंत्रात्मक तात्वीक अधिष्ठानाचे अध्ययन करणे :—

२४०० वर्षापूर्वी इ.स. पू. ४२२ मध्ये ग्रीक विचारवंत क्लेआन [illegible]मवदद्ध याने ''जे लोकांनी, लोकांसाठी व लोकांमार्फत असते ते ते सर्व सर्व म्हणजे लोकशाही'' याच परिभाषेला आधुनिक काळात अब्राहम लिंकनने अधोरेखीत करताना म्हटले की ''लोकांचे, लोकांनी आणि लोकांकरिता चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.'' लोकशाहीच्या मुख्य तत्वांची मांगड घालतांना जनता भार्वभौम असते, प्रातिनिधिक सरकार, प्रौढ मतदारांचे स्वातंत्र्य, लोकांचे कल्याण, लोकांना समान संधी, न्यायाची खात्री, संविधानात्मक मार्ग, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, इतरांशी असमत होण्याचे स्वातंत्र्य, सहनशीलता, शांततामय मार्गाचा अवलंब, समाजकल्याणाचे साधन, मुलभूत अधिकारांच्या माध्यमातून व्यक्तीमत्वाचा विकास, समतेचे तत्व, बहुसंख्यांकांचे शासन अल्पसंख्यांकांना रक्षणार्थ, संविधानात्मक मार्गाचा अवलंब या तत्त्वांचा अंतर्भाव प्रामुख्याने दृष्टीपथास येतो. ''भारत गणराज्य इ.स.पू. ६ वे ते ४ थ्या शतकाच्या दरम्यान होते. असे 'डिओडोरल' हा इतिहासकार सांगतो.''[४]

गौतम बुद्धाच्या काळात शाक्य, कोलीय, मल्ल व लिच्छवी अशी गणराज्ये असल्याचा व त्यात गरीब व श्रीमंत अशा सर्वांनाच सहभागी होता येत असे. या गणराज्याचे उल्लेख जैन, बौद्ध साहित्य, महाभारत, रामायण व कोटिल्याचे अर्थशास्त्र या पहावयास मिळते. प्राचीन ग्रीक राजकीय संदर्भात एक शहर आणि त्याच्या भोवलचा काही प्रदेश समाविष्ट असणाऱ्या पण स्वतंत्र व सार्वभौम राज्याला 'नगरराज्य' म्हणत असत. अथेन्समध्ये इक्लेशिया, बोऊल, कोर्ट किंवा डिस्कास्तेरिया लोकांसाठी निर्णय घेणाऱ्या संस्था होत्याच. स्पार्टामध्ये पेरिक्लस हा प्राचीन ग्रीस मधील एक पराक्रमी व मुत्सद्दी नेता होता. पेरिक्लसने स्पार्टाचा पराभव केला व अॅथेन्सचे श्रेष्ठतव सिद्ध केले होते. प्राचीन रोममध्येही लोकशाहीनुसार कायद्यासमोर समानता, ज्युलिअस सिझर रोमन राजनितीज्ञ, याने रोमण गणराज्याचा ऱ्हास करून रोमन साम्राज्यवादाचा उदय घडवून आणला



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

होता. रोमनचा हुकूमशहा म्हणून घोषीत व त्याने अनेक सुधारणा व विकास केला. पण तो सामान्याची बाजू घेतो व सिनेट नष्ट करण्याच्या संशयावरून त्याचा खून झाला. मध्ययुगीन काळात. विटेनजेमोट, मॅग्नाकार्टा (१२२५), मॉडेल पार्लमेंट (१२६५) लॅन्डस्जेमिन्डे अशाप्रकारे जागतिक स्तरावर लोकशाहीचा विकास होत गेला.

२१व्या शतकाच्या शेवटच्या दशकात सोव्हिएत रशीया प्रभावहिन झाला. विघटनानंतर भांडवलसाठी लोकाशाहीचा प्रभाव वाढला आहे. जागतिकीकरणामुळे हा बदल झालेला आहे. आज लोकाशाहीचा भर राजकीय समतेवर आहे. २१ शतकातील लोकशाहीचे दुसरे स्वरूप तात्विक लोकशाहीचे आहे. यात नागरिकांचा सकारात्मक कल दिसतो. राज्याच्या सकारात्मक भूमिकेची अपेक्षा अंतभूत आहे. विकसनशील राष्ट्रपैकी अनेकांनी लोकशाही स्विकारली आहे. जागतिकीकरणाच्या काळात हे लोक पुनःश्च भांडवलशाहीकडे अग्रेसर होत आहेत. या भांडवलशाहीचे नेतृत्व आदर्शवादी लोकशाहीची पुरस्कूर्ती अमेरिका करीत आहे. अमेरिकेच्या प्रभावातून युरोपियन राष्ट्रांनी भांडवलशाही लोकशाही स्विकारल्याचे प्रतीत होत आहे. आजही २१ व्या शतकात वास्तविक लोकाशाही स्थापन करणे हा प्रश्न कायमच आहे. राजकीय लोकशाही सोबत सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी अग्रम दिला पाहिजे. भारत, लॅटिन अमेरिका हे वास्तविक लोकशाही स्थापनेसाठी धडपडत आहे. तर अमेरिका, ब्रिटेन सामाजिक न्यायासाठी प्रयत्नरत आहेत. आज जागतीकीकरणाच्या काळात उत्तरदायित्वाची भावना वृद्धींगत असून याच श्रेय संसूचन साधनांच्या क्रांतीतून माहिती आदान—प्रदान वाढले आहे. लोकांच्या सजीव अपेक्षा सुधारणावादी दृष्टिकोणातून सुशासनाचा आधार बनत आहे. ज्या देशात राजकीय लोकशाही रूजली आहे तेथे सामाजिक व आर्थिक लोकशाहीची मागणी होत आहे. राष्ट्रीय स्तरापासून आंतराष्ट्रीय स्तरापर्यंत राजकीय व आर्थिक संस्थांमध्ये लोकशाहीकरणाची मागणी जोर धरत आहे. आज संयुक्त राष्ट्राची सुरक्षा समिती, आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष या अग्रगण्य संस्थावर विकसित देशांचे नियंत्रण आहे. या संस्थामध्ये विकसनशील राष्ट्रांना सहभागी करून घेतले पाहिजे असा विचार मांडल्या जात आहे

**निवडणूक अभियोग यंत्रणेबाब अध्ययन करणे :—**

''सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते.''[५] असे पोलॉक नामक राज्यशास्त्रज्ञ म्हणतो. त्या वरून नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनव्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यय निवडणूका हे असते. निवडणूकांमधून लोकांनी दिलेले कौल सरकारला अधिमान्यता मिळवून देतो, तसेच शांततामय मार्गानी व सुविहीतपणे सत्तांतर



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

होता. रोमनचा हुकूमशहा म्हणून घोषीत व त्याने अनेक सुधारणा व विकास केला. पण तो सामान्याची बाजू घेतो व सिनेट नष्ट करण्याच्या संशयावरून त्याचा खून झाला. मध्ययुगीन काळात. विटेनजेमोट, मॅग्नाकार्टा (१२२५), मॉडेल पार्लमेंट (१२६५) लॅन्डस्जेमिन्डे अशाप्रकारे जागतिक स्तरावर लोकशाहीचा विकास होत गेला.

२१व्या शतकाच्या शेवटच्या दशकात सोव्हिएत रशीया प्रभावहिन झाला. विघटनानंतर भांडवलसाठी लोकाशाहीचा प्रभाव वाढला आहे. जागतिकीकरणामुळे हा बदल झालेला आहे. आज लोकाशाहीचा भर राजकीय समतेवर आहे. २१ शतकातील लोकशाहीचे दुसरे स्वरूप तात्विक लोकशाहीचे आहे. यात नागरिकांचा सकारात्मक कल दिसतो. राज्याच्या सकारात्मक भूमिकेची अपेक्षा अंतभूत आहे. विकसनशील राष्ट्रपैकी अनेकांनी लोकशाही स्विकारली आहे. जागतिकीकरणाच्या काळात हे लोक पुन:श्च भांडवलशाहीकडे अग्रेसर होत आहेत. या भांडवलशाहीचे नेतृत्व आदर्शवादी लोकशाहीची पुरस्कूर्ती अमेरिका करीत आहे. अमेरिकेच्या प्रभावातून युरोपियन राष्ट्रांनी भांडवलशाही लोकशाही स्विकारल्याचे प्रतीत होत आहे. आजही २१ व्या शतकात वास्तविक लोकाशाही स्थापन करणे हा प्रश्न कायमच आहे. राजकीय लोकशाही सोबत सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी अग्रम दिला पाहिजे. भारत, लॅटिन अमेरिका हे वास्तविक लोकशाही स्थापनेसाठी धडपडत आहे. तर अमेरिका, ब्रिटेन सामाजिक न्यायासाठी प्रयत्नरत आहेत. आज जागतीकीकरणाच्या काळात उत्तरदायित्वाची भावना वृद्धींगत असून याच श्रेय संसूचन साधनांच्या क्रांतीतून माहिती आदान—प्रदान वाढले आहे. लोकांच्या सजीव अपेक्षा सुधारणावादी दृष्टिकोणातून सुशासनाचा आधार बनत आहे. ज्या देशात राजकीय लोकशाही रूजली आहे तेथे सामाजिक व आर्थिक लोकशाहीची मागणी होत आहे. राष्ट्रीय स्तरापासून आंतराष्ट्रीय स्तरापर्यंत राजकीय व आर्थिक संस्थांमध्ये लोकशाहीकरणाची मागणी जोर धरत आहे. आज संयुक्त राष्ट्राची सुरक्षा समिती, आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष या अग्रगण्य संस्थावर विकसित देशांचे नियंत्रण आहे. या संस्थामध्ये विकसनशील राष्ट्रांना सहभागी करून घेतले पाहिजे असा विचार मांडल्या जात आहे

**निवडणूक अभियोग यंत्रणेबाब अध्ययन करणे :—**

''सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते.''[५] असे पोलॉक नामक राज्यशास्त्रज्ञ म्हणतो. त्या वरून नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनव्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यय निवडणूका हे असते. निवडणूकांमधून लोकांनी दिलेले कौल सरकारला अधिमान्यता मिळवून देतो, तसेच शांततामय मार्गानी व सुविहीतपणे सत्तांतर



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

घडवून आणतो. त्यामुळे उत्तम निर्वाचन, व्यवस्था ही प्रातिनिधीक शासनाची आधारशिला असते. आधुनिक लोकतंत्रात्मक पद्धतीत प्रतिनिधी (कधीकधी न्यायपालिका आणि कार्यपालिका) यात विभिन्न पदावर व्यक्तीची निवडणूक करते. या व्यक्तींच्या निवडणूकीच्या माध्यमातून प्रादेशिक आणि स्थानिक जागांसाठी निवडणूका होत असतात. वास्तविकत: निवडणूका ह्य व्यापकदृष्ट्य प्रचलित आहे आणि खाजगी संस्थांमध्ये, क्लबमध्ये, विश्वविद्यालयांमध्ये, धार्मिक संस्थांमध्ये सुध्दा निवडणूक प्रक्रियेचा अवलंब केला जातो.

भारतीय लोकतंत्रात्मक पद्धतीत निवडणूक प्रक्रिया विभिन्न स्तरावर अर्थात संपूर्ण देशात संविधानानुसार लोकसभा आणि प्रत्येक घटकराज्यांच्या वेगवेगळ्या विधानसभांसाठी निवडणूक प्रक्रियेचे प्रावधान आहे. भारतीय संविधानाच्या भाग १५ मध्ये अनुच्छेद ३२४ ते अनुच्छेद ३२९ पर्यंत निवडणुक प्रक्रीयेला परिभाषीत केलेले आहे. अनुच्छेद ३२४ नुसार निवडनुकीचे संचालन, निर्देशन आणि नियंत्रण भारतीय निवडणूक आयोगात निहीत आहे. त्यानुसार निवडणूक आयोगावर निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी सोपविली आहे. १९८९ पर्यंत एकसदस्यीय निवडणूक आयोग होता. परंतु १६ ऑक्टोबर १९८९ च्या राष्ट्रपतीच्या अधिसुचनेनुसार ह्म निवडणूक आयुक्त नव्याने नियुक्त केल्या गेले.

भारतातील एकुण ५४३ लोकसभेतील जागांसाठी निरनिराळ्या घटक राज्यातुन लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधी जनतेव्दारे निवडुन दिल्या जाते. नागरी स्थानिक संस्थांमधील प्रतिनिधी राज्य निवडणूक आयोगद्वारा निवडणूक प्रक्रिया पार पाडते. भारत निवडणूक आयोगव्दारा लोकसभेतील व विधानसभेतील प्रतिनिधी निवडल्या जाते. प्रौढ मताधिकाराच्या पद्धतीने जनता प्रत्यक्ष मतदान करून लोकसभेसाठी व विधानसभेसाठी आपले प्रतिनिधी निवडतात. लोकसभेचा व प्रत्येक घटकराज्यातील विधानसभांचा कार्यकाल हा ५ वर्षाचा निश्चित केलेला आहे. निवडणूक घेण्यापूर्वी निवडणूक आयोग संबंधित अधिसूचना काढत असते. आधिसूचना काढल्यानंतर संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत नामांकन, निवडणूक आणि मतमोजणी असे तिन भागात कार्य चालते. निवडणुकीबाबत अधिसूचना काढल्यानंतर नामांकन पत्र दाखल करण्यासाठी क्त दिवसांचा अवधी दिला जातो. त्यापैकी १ दिवस छाननीसाठी ठेवला जातो. काही कारणास्तव नामांकन पत्र रद्द सुद्धा होऊ शकते. कोणत्याही उमेदवाराला नाव मागे घ्यायचे असेल तर ह्म दिवसाचा अवधी दिला जातो. कारण काही लोकांची निवडणूक लढविण्याची इच्छा नसते. तेव्हा ते उमेदवार आपले नाव विचारविनीमय करून परत घेतात.

नमांकन परत घेण्याचे काम सर्वसाधारणपणे दोन दिवसात होते. कधी कधी काही कारणास्तव कोणत्याही निर्वाचन क्षेत्रात पुनर्मतदानासाठी वेगळा दिवस निधारित केला जातो. मतदान निर्धारित मतदान केंद्रावर सकाळी ७ वाजेपासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्वसाधारणपणे पार पडत असते. गरज भासल्यास कधी



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

कधी पूनर्मतदानासाठी वेगळाच दिवस निधारित केल्या जातो. आज इलेक्ट्रॉनीक वोटिंग मशिनचे आगमणापासून मतमोजणीसाठी सामान्यपणे एक दिवसाचा वेळ असतो. लगातार मतमोजणीसाठी मतदान केंद्र तयार केल्यामुळे अनधिकृत व्यक्तीला मतदान केद्रात प्रवेश नाकारला जातो. सर्व उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी आणि पत्रकारांसाठी रिटर्निंग ऑफिसरद्वारे प्रवेशपत्र दिले जाते. वर्तमानकाळात मतांची मतमोजणी निर्वाचन क्षेत्राद्वारे केली जाते आणि सर्व मतदान केंद्रावर मतमोजणी करून निकाल घोषित केल्या जातो. सार्वत्रिक निवडणुकीत ज्या राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होते ते केंद्र किंवा राज्यात आपले सरकार बनविते.

देशातील सर्व श्रेष्ठ पदे अर्थात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि राज्यसभा यातील निवडणुकांमध्ये जनतेच्या निर्वाचीत प्रतिनीधींचा समावेश असतो. निवडणुकीदरम्यान सर्व प्रशासकीय यंत्रणा ही निवडणुक आयोगाच्या नियंत्रणाखाली पार पडत असते. निवडणुकीची घोषणा झाली की आचारसंहिता लागू केली जाते आणि प्रत्येक राजकीय पक्षांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना आणि उमेदवारांना त्यांचे पालन करावे लागते. लोकतंत्रात्मक आधुनिक प्रतिनिधी निवडणे म्हणजे निवडणुकीचा सार्वभौमिक उपयोग साधन म्हणुन लोकतंत्राच्या सार्वभौम सत्तेच्या उपयोगाच्या विपरीत आहे. जसे मनमानी प्रथा, प्राचीन ॲथेन्समध्ये निवडणुकीला एक कुलीन संस्था मानले जात होते. अधिकार राजकीय कार्यालयसुद्धा या वापरापासून संतुष्ट होते. कारण लॉटरी पद्धतीने निवड लॉट कास्टींग करून केल्या जायचा. निवडणूक सुधारणा एक नि:पक्ष निवडणूक प्रणाली वा सौंदर्यशास्त्र उपस्थिती प्रणालीची प्रभावशिलता वाढविण्याची प्रक्रियांचे वर्णन करते ते येथे नाही. जनतेची इच्छा, निवडणुकीच्या संदर्भात सार्वभौम लोकांचा कौल (विशेषकरून भविष्याच्या परिणामांची भविष्यवाणीच्या संदर्भात) निवडणूक वैज्ञानिक अध्ययन, सांखीकीय अध्ययन अर्थात ''निर्णय घेतला की तय केला'' आणि अन्य प्रकारच्या मतपत्रिका जसे जनमतसंग्रह याला कधी कधी निवडणूकीच्या स्वरूपात संदर्भांकित केले जाते हे आपल्याला संयुक्त राज्यांमध्ये दृष्टिपथात पडते.

**सुशासनाच्या संकल्पनेचे अध्ययन करणे :—**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे विविध क्षेत्रात मोठ्य प्रमाणात बदल घडून आले आहेत. तद्वतच शासन आणि प्रशासन व्यवस्थेतही मोठ्य प्रमाणात झालेले बदल, प्रामुख्याने अभ्यासनाची गरज आहे.

सुशासनाचे प्रमुख तत्व :—

संयुक्त राष्ट्रसंघानुसार सुशासनाची खालिलप्रमाणे वैशिष्ट्ये दिलेली आहेत. कायद्याचे अधिराज्य, समानता आणि सर्वसमावेशकता, सहभागीत्व, उत्तरदायित्व, बहुमत/मतैक्य, परिणामकारकता आणि दक्षता, पारदर्शकता, जबाबदारपणा, निष्पक्ष आकलन यांचा अंतर्भात केलेला आहे. सुशासनात



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

कोणतेही सामाजिक — राजकीय संघटन सुपरिणाम देणारे ठरावे. सदाचार आला की, जंगलराज, भ्रष्टचार संपला की चांगले शासन निर्माण होते. शासन या शब्दाला 'सु' उपसर्ग लावल्यावर 'सुशासन' शब्दाचा जन्म होतो. 'सु' उपसर्गचा अर्थ शुभ, चांगले, मंगलमय या भावना समोर येतात. ''राजकीय आणि सामाजिक जीवनाच्या भाषेत सुशासनाला प्रमाणीत करणारे प्रशासन, स्वशासन, अनुशासन हे सर्व शब्द शासनाशी निगडीत आहे. विकासक्रमांची परंपरा ज्ञान, लोककल्याणाची भावना प्रबल प्रेरणादायी होती. मग शासनाच्या यंत्रणा कृत्रिम ठरतात. मग प्रशासन स्मार्ट (SMART) बनते.''[६]

S – Simple साधारण

M – Moral नैतिक

A – Accountable उत्तरदायी

R – Responsible जबाबदारयोग्य

T – Transparent पारदर्शक

उपरनिर्दिष्ट यंत्रणा मानवी कल्याणासाठी लोकशाही राज्यकारभारात कार्यक्षम व प्रभावी प्रशासनाची हमी म्हणजे सुशासन होय. यात भ्रष्टाचाराला संस्थात्मक बंधनात आणणे व कामकाजाच्या बाजार अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार परिभाषीत करणे, लोकशाहीची बांधीलकी, कार्यक्रम व खुले प्रशासन, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात स्पर्धा, बाजारपेठांची वैधता या अर्थाने सुशासन, स्वतंत्र न्यायपालीका, निपक्षपातीपणा, समानतेवर आधारित कायदे विविध आंतरराष्ट्रीय संस्थानी ग्रहित धरली होती. स्विकार्यता आणि सक्षम सार्वजनिक सेवा, उत्तरदायी निर्णय व्यवस्था या आधारे राजकीय संस्थांनी समाजात विविध हितसंबंध गुंतवून सर्वसाधारण जनमानस प्रभावीपणे प्रोत्साहित करावे, मजबूत नागरी समाजाचे महत्त्व अधिकृत व्हावे. सामाजिक उद्दिष्टये, न्याय आणि पर्यावरणीय संरक्षणासह इतर संघटनांचा वापर करून सार्वजानिक क्षेत्रात सुधारणा करण्याचा मानस व प्रोत्साहन. हे गृहितके आहेत.

जागतिक बैंक, संयुक्त राष्ट्रासारख्या काही आंतरराष्ट्रीय संस्था देखील नवीन सार्वजनिक व्यवस्थापनासह सुशासनाशी संबंधित आहेत. जागतिक बँकेने १९८९ ला प्रकाशित सहारा— आफ्रिदी उपखंडावरील आपल्या अहवालात सुशासनाची संकल्पना प्रथम मांडली. या सार्वजनिक क्षेत्रांचे व्यवस्थापन, शासनाचे उत्तरदायित्व, विकासाचे कायदेशीर प्रारूप, माहिती व पारदर्शकता या चार वैशिष्ट्यंचा उहापोह केला गेला. जागतिक बैंकने १९९२ ला प्रसिद्ध केलेल्या शासन प्रक्रिया व विकास या अहवालानुसार शासन ही निरंतर चाललारी प्रक्रिया आहे, शासनास अपेक्षीत दिशा देता येते, सुशासनासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करावे लागतात, नागरिकांनीसुद्धा सुशासनाची मागणी केली पाहिजे, शासनाने नागरिकांच्या मागण्यास योग्य प्रतिसाद द्यावा, अर्थात सुशासन प्रस्थापित करण्यासाठी इतर बाहय दुवे, संसाधने सहाय्यक ठरावे आणि हा बदल



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

चिरंतर ठेवण्यासाठी त्या त्या समाजामध्ये सुशासन खोलवर रुजणे आवश्यक आहे. ''भारतामध्ये सुशासनाच्या संदर्भात माहितीचा अधिकार, नागरिकांची सनद, ई—शासन, आधार, मनरेगा या योजना आणि धोरणांच्या माध्यमातून सुशासनाच्या दिशेने महत्वाची पाउले टाकलेली आहेत.''[७]

जगातील सर्वात मोठी लोकशाही गेल्या ७४—७५ वर्षापासुन आपण संविधानातील निहित उद्देशांना वास्तविकतेत बदलण्यास सातत्याने प्रयत्नशील आहोतच. ''जनतेच्या खुशीत राजाची खुशी असते, जनतेच्या कल्याणतच राजाचे कल्याण असते, असे महान अर्थतज्ञ आचार्य कौटील्यांनी आपल्या अर्थशास्त्र ग्रथांत मटले आहे.'' जगभरातील सरकारांनी उत्तरदायी पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनाला अंगीकारले आहे. योग्यता, तत्परता, उत्तरदायीत्व, संपर्क, विश्वसनियता, सुउद्देश, सातत्य अशी उदात्त तत्वे निहित आहेत. भारताकडे विशाल मानव संसाधन, सर्वोत्तम नागरी सेवा, रचनात्मकता, विविध क्षेत्रातील शिफारशी आणि सूचनांच्या माध्यमातून गरीब आणि श्रीमंतामधील दरी संपविण्याची गरज आहे. गरीब घटकांचे रक्षण, त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि निवारा यांना सर्वोच्च स्थानी आणावे लागेल. प्रत्येक सुधारणांना मानवी चेहरा असावा, सोबतच विकासाचा लाभ अंतिम घटकातील व्यक्तीपर्यंत पोहचावा. जनतेच्या पैशाचा वापर योग्य सेवा आणि स्थायी संपत्तीच्या निर्मितीसाठी केला जावा, सातत्यपूर्ण संपर्क हे सुशासनाचे महत्वपूर्ण अंग आहे. सरकारने जनतेशी संपर्क करून विचारांची आदान—प्रदान करणारी दळण वळण साधनांचा अवलंब केला पाहिजे.

आपल्या भारतात अटलबिहारी वाजपेयी हे संपर्क क्रांतीचे सूत्रधार आहेत. त्यांच्या जन्मदिनीच आपण सुशासन हा दिवस साजरा करतो. सुशासनातील सर्वात मोठे अडसर म्हणजे अधिकारांचे केंद्रीकरण किंवा अतीकेंद्रीकरण. नोकरशाहीत विविध स्तरांवर सत्तेचे केंद्रीकरण, राजकारणाचे अशुद्धीकरण, पंचायतराज ते संसद यांच्या निवणुका एकाचवेळी न होणे, कठोर कायदेशीर तरतुदी नसणे, पक्षांतराचे वाढते प्रमाण, यांना आवर घालण्यासाठी जनतेने चारीत्र्य, क्षमता, योग्यता आणि आचरण थ्वनत दृ ब बैंतबजमतए ब्वंबपजलए ब्सपइमतए ब्वदकनबज या आधारावर उमेदवारांना मते द्यायला हवी. संविधानातील घटना दुरूस्ती ७३ व ७४ मधील सुधारणांना तळागाळातील स्तरावर प्रभावीपणे लागू करावे. पंचायत आणि नागरी संस्थांना पुरेसा निधी आणि अधिकार उपलब्ध करून द्यावेत. विकास आणि सुशासन हातात हात घालून चालतात. जेथे भय, भूक, भेदभाव, भ्रष्टाचार आणि अत्याचाराला काणतेही स्थान उरणार नाही, तेव्हाच आपण 'सुशासन' आले असे म्हणु शकतो.



Adarsh Arts & Commerce College
Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

संदर्भसुची :—

1. Levi David (Ed) : The Oxford Handbook of Governance, Oxford, 25 April २०१६

2. लोकमत न्यूज नेटवर्क : 'सुशासन निर्माण करण्यासाठी' लोकमत न्युज नेटवर्क Published : January 04, २०२१

3. मनोज जाधव : जिल्हापरिषद सामान्य विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव, सुशासन निर्माण करण्यासाठी लोकमत न्यूज नेटवर्क Published : January 04, २०२१

4. प्रशांत विघे : लोकशाही निवडणुक प्रक्रिया आणि सुशासन, डॉ. धर्मेन्द्र तेलगोटे श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर पेज नं. ६.

5. डॉ भास्कर लक्ष्मण भोळे : भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिपलापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स, नागपूर पे ने ३०३

6. विकिपीडिया

7. Levi David (Ed) : The Oxford Handbook of Governance, Oxford, 2012

8. निला संगमेश्वर : The Oxford Handbook of Governance, Oxford, 05/10/2019

9. प्रशांत विघे : लोकशाही निवडणुक प्रक्रिया आणि सुशासन, डॉ. धर्मेन्द्र तेलगोटे श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २०१९

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli




## डॉ. नितीन डी. गौरखेडे

एम. ए., एम. फिल. (राज्यशास्त्र), पीएच. डी.
सहाय्यक प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय,
रोहना, ता. आर्वी, जि. वर्धा.


- १२ वर्षाचा अध्यापन कार्याचा अनुभव.
- आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय जर्नलमधून शोधनिबंध प्रकाशित.
- राष्ट्रीय परिषद व चर्चासत्रामध्ये साधनव्यक्ती म्हणून सहभाग.




## डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी (गंगणे)

एम. ए. ( लोकप्रशासन ), बी.एड्., सेट, पीएच. डी.
सहयोगी प्राध्यापक,
लोकप्रशासन विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,
कै. रमेश वरपुडकर कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी.


- २२ वर्षाचा अध्यापन कार्याचा अनुभव.
- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रातून सहभाग व पेपर वाचन.
- आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय जर्नलमधून पेपर प्रकाशित. तसेच वृत्तपत्रांमध्ये लेख प्रकाशित
- Women's Safety : Challenges and Remedies', ' Impact of Social Media on Society'
- या विषयावर ' भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद' (ICSSR) द्वारे पुरस्कृत राष्ट्रीय परिषद व चर्चासत्राचे आयोजन. तसेच विविध कार्यशाळांचे आयोजन. राष्ट्रीय परिषद व चर्चासत्रामध्ये साधनव्यक्ती म्हणून सहभाग.
- पंचायतराज संस्थेतील महिला प्रतिनिधी व निर्णय प्रक्रिया व कार्यालय प्रशासन' या पुस्तकांचे प्रकाशन.


**Aadhar Publications**
New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal, VMV Road, Amravati - 444604.
Email - aadharpublication@gmail.com. M.: 9595560278

ISBN:978-93-91305-63-5



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli